Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे



। मंगळवार, दि. २० ऑक्टोंबर २०२६ । वर्ष १ । अंक १९० । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

आमच्या देशातील उद्रेकाला मध्यपूर्वेतील युद्ध जबाबदार

मुंबई। मध्यपूर्वेतील संघर्ष म्हणजेच युद्ध वाढले असून तेवढे सोसायचे होते तेवढे सोसून झाल्यावर आता मात्र युरोपातील परिस्थिती हाताबाहेर जात आहे . एकाच वेळी इटली ,फ्रान्स ,अल्बानिया , पॅरिस , पोर्तुगाल इथे सरकारच्या शिक्षण , महागाई , बेरोजगारी ,भ्रष्टाचार , इंधन आणि गॅस दरवाढ यामुळे जनता रस्त्यावर उतरली आहे . जागोजागी पोलिसांसोबत संघर्ष करत आंदोलनकर्ते आपला निषेध नोंदवत आहेत . इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्षामुळे जागतिक तेलपुरवठ्यावर परिणाम झाला असून इंधनाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे . याचा थेट फटका आता फ्रान्समधील सामान्य नागरिकांना बसत आहे . फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅनुएल मॅक्रॉन यांनीही मध्यपूर्वेतील युद्धाचा इंधन दरवाढीशी असलेला संबंध स्पष्ट केला आहे . यासगळ्यामुळे जगभरात आता या युद्धाची गरज नसून उगाच युद्ध आमच्यावर लादले आहे अशी भावना निर्माण झाली आहे.

दोन मेळावे, दोन भूमिका! शिवाजी पार्कवर उद्धव ठाकरेंचा एल्गार, तर नेस्कोतून एकनाथ शिंदेंची तोफ धडाडणार!

दसरा मेळाव्यांतून राजकीय शक्तिप्रदर्शनाची तयारी!

जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात दसरा मेळाव्याला विशेष महत्त्व आहे. यंदाही दोन शिवसेनांचे दसरा मेळावे राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आले असून, शिवाजी पार्क आणि गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये होणाऱ्या सभांकडे राज्याचे लक्ष लागले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे शिवाजी पार्कवरून कोणता राजकीय एल्गार पुकारणार, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नेस्को सेंटरमधून विरोधकांना कशा शब्दांत प्रत्युत्तर देणार, याबाबत कार्यकर्त्यांसह राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे.

लोकशाही, हुकूमशाही आणि सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेवरून राजकीय वातावरण तापणार

दोन्ही मेळाव्यांच्या माध्यमातून आपापली राजकीय भूमिका ठळकपणे मांडण्याची आणि कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याची रणनीती आखण्यात आली आहे. त्यामुळे या सभा केवळ दसरा मेळाव्यापुरत्या मर्यादित न राहता आगामी राजकीय घडामोडींच्या दृष्टीनेही महत्त्वाच्या ठरण्याची शक्यता आहे.

शिवाजी पार्कवरून उद्धव ठाकरेंचा लोकशाहीचा नारा

दादर येथील ऐतिहासिक शिवाजी पार्कवर होणाऱ्या मेळाव्यात उद्धव ठाकरे केंद्र सरकारच्या धोरणांवर आणि सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेवर टीका करणार का, याकडे विशेष लक्ष



आहे. लोकशाही, संविधान आणि विरोधकांचा आवाज यांसारखे मुद्दे त्यांच्या भाषणाच्या केंद्रस्थानी राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मेळाव्यापूर्वी शिवसेना (उबाठा) पक्षाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या पोस्टरवर 'हुकूमशाहीला दणका देण्यासाठी, लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी चला, एल्गार करूया!' असा संदेश देण्यात आला आहे. या घोषणेतून पक्षाने आपल्या राजकीय लढ्याची दिशा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. उद्धव ठाकरे आपल्या भाषणातून विरोधकांवरील कारवाई, केंद्र सरकारची धोरणे आणि महाराष्ट्राच्या राजकीय परिस्थितीवर कोणती भूमिका मांडतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

नेस्को सेंटरमध्ये शिंदेंच्या भाषणाकडे लक्ष

दुसरीकडे, गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा दसरा मेळावा होणार आहे. या मेळाव्यातून शिंदे केंद्र आणि राज्य सरकारच्या भूमिकेचे समर्थन करताना विरोधकांच्या आरोपांना कसे उत्तर देतात, याबाबत उत्सुकता आहे. तसेच शिवसेनेची राजकीय भूमिका, सरकारची कामगिरी आणि आगामी काळातील पक्षाची दिशा याबाबत ते कोणते संकेत देतात, याकडेही लक्ष लागले आहे. यंदा शिंदे यांच्या शिवसेनेने मेळाव्याच्या स्वरूपात काही बदल केले आहेत. नेस्को सेंटरमधील सभेत सांस्कृतिक कार्यक्रम आणि सेलिब्रिटींच्या सादरीकरणाऐवजी थेट भाषणांवर भर दिला जाणार आहे. मेळावा साधारण दोन ते अडीच तासांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे यंदाच्या सभेत राजकीय संदेश आणि नेतृत्वाची भूमिका यांनाच प्राधान्य मिळण्याची शक्यता आहे. मात्र, या मेळाव्यांचे महत्त्व केवळ गर्दीच्या आकड्यांवरून ठरणार नाही. दोन्ही नेते जनतेच्या प्रश्नांवर काय बोलतात, विरोधकांना कोणते प्रत्युत्तर देतात आणि आगामी राजकारणाबाबत कोणते संकेत देतात, यावर त्यांच्या भाषणांचा प्रभाव अवलंबून असेल. त्यामुळे शिवाजी पार्कवरून लोकशाहीचा एल्गार घुमणार की नेस्कोतून सत्ताधारी भूमिकेची जोरदार मांडणी होणार, याचे उत्तर दोन्ही नेत्यांच्या भाषणांतून मिळणार आहे.

शक्तिप्रदर्शनासोबत राजकीय संदेशाची कसोटी

दोन वेगवेगळ्या ठिकाणी होणाऱ्या या मेळाव्यांमध्ये दोन्ही पक्षांची संघटनात्मक ताकद, कार्यकर्त्यांचा उत्साह आणि नेतृत्वाची संवादशैली दिसून येणार आहे. शिवाजी पार्कवरील ऐतिहासिक परंपरा आणि नेस्को सेंटरमधील नव्या स्वरूपातील मेळावा यांची तुलना राजकीय चर्चेला अधिक धार देऊ शकते.

'निकाल चोरायचा प्रयत्न केला तर घराबाहेरही पडू देणार नाही : रोहित पवार

जन सम्राट टाईम्स

नाशिक । प्रतिनिधी: कोल्हापूरच्या राजकारणात प्रतिष्ठेची मानली जाणारी गोकुळ दूध संघाची निवडणूक आता नव्या वादामुळे चर्चेत आली आहे. सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने 13 जागा जिंकल्या असून महायुतीला 12 जागा मिळाल्याची माहिती आहे. मात्र, एका जागेवरील फेरमतमोजणीनंतर निकाल बदलल्याने राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणावरून सत्तेच्या दुरुपयोगाचा आरोप केला आहे. गोकुळ दूध संघाच्या 25 जागांसाठी झालेल्या निवडणुकीच्या मतमोजणीकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं होतं. सुरुवातीच्या कलांमध्ये सतेज पाटील यांच्या पॅनेलने आघाडी घेतली होती. मात्र, एका जागेवरील मतांची फेरमोजणी झाल्यानंतर चित्र बदललं.या फेरमतमोजणीत सतेज पाटील यांच्या पॅनेलचे सचिन घोरपडे पराभूत झाले, तर महायुतीचे अमर पाटील विजयी झाल्याचं सांगण्यात येत आहे. या बदलामुळे सतेज पाटील यांच्या आघाडीच्या जागांची संख्या 13 वर आली, तर महायुतीने 12 जागा मिळवल्या.फेरमतमोजणीच्या मुद्द्यावर आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत आक्रमक भूमिका घेतली. निवडणुकीचा कौल स्पष्ट असतानाही सत्तेचा गैरवापर करून अपेक्षित निकाल मिळवण्यासाठी हालचाली सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला.निवडून आलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्र न देता फेरमतमोजणीच्या माध्यमातून निकाल बदलण्याचा प्रयत्न होत असल्याचं त्यांचं म्हणणं आहे. निकाल चोरण्याचा प्रयत्न झाल्यास प्रामाणिक सभासदांकडून तीव्र



विरोध होईल, असा इशाराही त्यांनी दिला. रोहित पवार यांच्या या आरोपांमुळे गोकुळच्या निवडणुकीतील वादाला नवं वळण मिळालं आहे.उपलब्ध माहितीनुसार, महायुतीच्या तीन उमेदवारांनी फेरमतमोजणीसाठी अर्ज केल्यानंतर पुढील कायदेशीर प्रक्रियेबाबत चर्चा सुरू झाली आहे. निकालात बदल झाल्यास पुढे कोणती पावलं उचलता येतील, यासाठी वकिलांचाही सल्ला घेतला जात असल्याचं सांगितलं जात आहे.उपलब्ध आकडेवारीनुसार, सतेज पाटील यांच्या समविचारी आघाडीला 13 जागा, तर महायुतीला 12 जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे समविचारी आघाडीने आवश्यक संख्याबळ मिळवल्याचं चित्र आहे. मात्र, फेरमतमोजणी आणि निकालासंदर्भातील पुढील अधिकृत निर्णयांवर सर्वांचं लक्ष राहणार आहे.

गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत एका जागेच्या फरकाने राजकीय समीकरणं बदलण्याची शक्यता असल्याने हा वाद आता अधिक चिघळण्याची चिन्हं आहेत. रोहित पवार यांच्या आरोपांवर निवडणूक यंत्रणा आणि संबंधित पक्षांकडून काय भूमिका घेतली जाते, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.कोल्हापूरच्या राजकारणात प्रतिष्ठेची मानली जाणारी गोकुळ दूध संघाची निवडणूक आता नव्या वादामुळे चर्चेत आली आहे. सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने 13 जागा जिंकल्या असून महायुतीला 12 जागा मिळाल्याची माहिती आहे. मात्र, एका जागेवरील फेरमतमोजणीनंतर निकाल बदलल्याने राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणावरून सत्तेच्या दुरुपयोगाचा आरोप केला आहे. गोकुळ दूध संघाच्या 25 जागांसाठी झालेल्या निवडणुकीच्या मतमोजणीकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं होतं. सुरुवातीच्या कलांमध्ये सतेज पाटील यांच्या पॅनेलने आघाडी घेतली होती. मात्र, एका जागेवरील मतांची फेरमोजणी झाल्यानंतर चित्र बदललं.या फेरमतमोजणीत सतेज पाटील यांच्या पॅनेलचे सचिन घोरपडे पराभूत झाले, तर महायुतीचे अमर पाटील विजयी झाल्याचं सांगण्यात येत आहे. या बदलामुळे सतेज पाटील यांच्या आघाडीच्या जागांची संख्या 13 वर आली, तर महायुतीने 12 जागा मिळवल्या.फेरमतमोजणीच्या मुद्द्यावर आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत आक्रमक भूमिका घेतली. निवडणुकीचा कौल स्पष्ट असतानाही सत्तेचा गैरवापर करून अपेक्षित निकाल मिळवण्यासाठी हालचाली सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला.

दहा हजार मते बाद, तर पदवी कोणी दिली?

जन सम्राट टाईम्स

सांगली । प्रतिनिधी: शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगलीत महायुतीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेतली. या सभेत त्यांनी बाद होणाऱ्या मतांवरून मिश्किल टिप्पणी केली. त्याचबरोबर महाराष्ट्रातील उद्योग, गुंतवणूक, रोजगार आणि शेतकरी मदतीबाबत सरकारची भूमिका मांडली. शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मतपत्रिकांवरील बाद मतांचा मुद्दा उपस्थित करत फडणवीस म्हणाले की, दहा हजार मते बाद होत असतील, तर अशा पदवीधर आणि शिक्षकांना पदवी कोणी दिली, हे तपासावे लागेल. त्यांच्या या वक्तव्याची सभेत चर्चा झाली. राज्यातील विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी भाजप आणि महायुतीचे नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.राज्यात उद्योग आणि गुंतवणुकीच्या संधी वाढत असल्याचा दावा फडणवीस यांनी केला. मागील वर्षी महाराष्ट्रात 30 लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार झाल्याचे त्यांनी सांगितले. परकीय गुंतवणुकीतही महाराष्ट्र



पहिल्या क्रमांकावर असल्याचे त्यांनी नमूद केले. नवीन उद्योग राज्यात आणून तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे हे सरकारचे प्राधान्य असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागात पाणी पोहोचवण्यासाठी सरकारने काम केल्याचे फडणवीस यांनी सांगितले. शेतकऱ्यांचे वीजबिल माफ करण्याच्या निर्णयाचाही त्यांनी उल्लेख केला. राज्यात दुष्काळी परिस्थिती असतानाही शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार ठामपणे उभे असल्याचे त्यांनी म्हटले. दिलेल्या माहितीनुसार, पुणे शिक्षक मतदारसंघातून महायुतीने कौस्तुभ गावडे यांना, तर पदवीधर मतदारसंघातून स्मिता जाधव यांना उमेदवारी दिली आहे. महाविकास आघाडीकडून शिक्षक मतदारसंघात विद्यमान आमदार जयंत आसगावकर आणि पदवीधर मतदारसंघात हर्षदा जाधव-देशमुख रिंगणात असल्याचे सांगितले जाते. अपक्ष उमेदवार दत्तात्रय सावंत आणि सचिन सानप यांचाही प्रचार सुरू आहे. एकूणच, शिक्षक-पदवीधर निवडणुकीच्या प्रचारात मतदार, बाद मते, रोजगार, गुंतवणूक आणि शेतकरी प्रश्न हे मुद्दे चर्चेत आले आहेत. आता या प्रचाराचा मतदारांवर काय परिणाम होतो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

एमआयजी कॅरम स्पर्धेत घाडिगावकर, मोरे यांची बाजी!

मुंबई : एमआयजी क्रिकेट क्लब, वांद्रे येथे आयोजित चौथ्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत (Carrom Tournament) महिला एकेरी गटात ठाण्याच्या समृद्धी घाडिगावकरने, तर पुरुष एकेरी गटात मुंबईच्या प्रशांत मोरेने विजेतेपद पटकावले. महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात समृद्धीने मुंबईच्या ऐशा महम्मद साजिदचा पराभव केला. पहिला सेट 4-25 असा गमावल्यानंतर समृद्धीने जोरदार पुनरागमन करत दुसरा सेट 23-18 आणि तिसरा सेट 25-8 असा जिंकला. या विजयासह तिने स्पर्धेचे विजेतेपद आपल्या नावावर केले.

महासभेत हाणामारी, तरीही कोटींच्या प्रस्तावांना मंजुरी

जन सम्राट टाईम्स

भाईंदर | प्रतिनिधी: मिरा-भाईंदर महापालिकेच्या शुक्रवारी झालेल्या महासभेत चित्रीकरणाच्या मुद्द्यावरून तुफान हाणामारी आणि गोंधळ उडाला असतानाच सत्ताधारी भाजपने शेकडो कोटी रुपयांच्या खर्चाशी संबंधित महत्त्वाच्या प्रस्तावांना मंजुरी दिली. भुयारी गटार योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी सुमारे ५०० कोटी रुपये, तर मलनिःसारण केंद्रांच्या देखभाल-दुरुस्ती आणि पुनर्बांधणीसाठी १८८ कोटी रुपयांच्या खर्चाच्या प्रस्तावांचा यात समावेश आहे. मात्र, एवढ्या मोठ्या आर्थिक तरतुदींशी संबंधित प्रस्तावांवर सविस्तर चर्चा न करता बहुमताच्या जोरावर निर्णय घेतल्याने महापालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे शहराच्या विकासासाठी होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या खर्चाची गुणवत्ता, पारदर्शकता आणि कामांच्या अंमलबजावणीबाबत चर्चा होणे आवश्यक असताना महासभेचे कामकाज घाईघाईने उरकण्यावर विरोधकांनी आक्षेप घेतला. महापालिकेच्या महासभेत चित्रीकरणाच्या मुद्द्यावरून शुक्रवारी मोठा वाद निर्माण झाला. भाजपच्या काही नगरसेवकांनी प्रेक्षक गॅलरीत जाऊन नागरिक आणि पत्रकारांना मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकरणी सुमारे १६ नगरसेवकांविरोधात भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची माहिती आहे. दुसरीकडे, नगरसेवक आणि महापालिका प्रशासनाच्या तक्रारींवरून काही नागरिकांविरोधातही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घटनेमुळे महासभेतील वातावरण चांगलेच तापले. मात्र, या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आर्थिक आणि विकासविषयक निर्णयांची प्रक्रिया कशी पार पडली, हा मुद्दाही आता चर्चेत आला आहे.महासभेपूर्वीच नवरात्रीच्या कार्यक्रमांना उपस्थित राहायचे असल्याचे कारण देत कामकाज लवकर आटोपण्याची भूमिका महापौरांनी घेतल्याचा आरोप करण्यात आला. यासाठी लक्षवेधी सूचना आणि प्रश्नोत्तरांचा तासही घेण्यात आला नसल्याचे सांगितले जात आहे. विषयपत्रिकेवर सुमारे ३२ विषय असताना अनेक विषय एकत्रित चर्चेला घेऊन त्यावर जलद गतीने मतदान करण्याच्या सूचना देण्यात आल्याने विरोधकांनी नाराजी व्यक्त केली. महिन्यातून साधारणतः एकदाच होणाऱ्या महासभेत शहराच्या विकासाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा होणे अपेक्षित असते. विशेषतः कोट्यवधी रुपयांचा खर्च असलेल्या योजनांमध्ये कामाचे स्वरूप, अंदाजित खर्च, निविदा प्रक्रिया, कालमर्यादा आणि कामाच्या गुणवत्तेचे निकष यांवर नगरसेवकांना प्रश्न विचारण्याची संधी मिळणे महत्त्वाचे आहे. मात्र, कामकाज जलदगतीने उरकण्यात आल्याने या मुद्द्यांवर पुरेशी चर्चा झाली का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.महासभेत भुयारी गटार योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी सुमारे ५०० कोटी रुपयांच्या खर्चाशी संबंधित प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. शहरातील सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन आणि प्रक्रिया यंत्रणा सक्षम करण्याच्या दृष्टीने ही योजना महत्त्वाची मानली जाते.



जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

विधान परिषदेच्या पाच जागांसाठी 182 उमेदवार रिंगणात!


२३ ऑक्टोबरला मतदान, २७ ऑक्टोबरला मतमोजणी; १० लाखांहून अधिक मतदार बजावणार मतदानाचा हक्क

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी : महाराष्ट्र विधान परिषदेच्या पाच जागांसाठी निवडणुकीचा रणसंग्राम रंगला असून, पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांतील राजकीय चुरस वाढली आहे. औरंगाबाद, पुणे आणि नागपूर विभागांतील तीन पदवीधर, तर अमरावती आणि पुणे विभागांतील दोन शिक्षक मतदारसंघांसाठी शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. या पाचही जागांसाठी तब्बल १८२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून, १० लाख ६८ हजार ७२ मतदार त्यांचे राजकीय भवितव्य ठरवणार आहेत. मंगळवार, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार असल्याने निकालाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. मतदान प्रक्रिया सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत पार पडणार आहे. निवडणुकीसाठी पाचही मतदारसंघांत एकूण २ हजार ४१९ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे.

पुणे पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक उमेदवार

पाच मतदारसंघांतील उमेदवारांची संख्या पाहता पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक चुरस असल्याचे चित्र आहे. येथे ४७ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातून ४१, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून ३८, पुणे विभाग



शिक्षक मतदारसंघातून ३०, तर अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून २६ उमेदवार रिंगणात आहेत.

पाचही मतदारसंघांतील उमेदवारांची संख्या लक्षात घेता पदवीधर आणि शिक्षक मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने जाणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. विविध राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारांनीही निवडणुकीत ताकद लावली असून, मतदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

२ हजार ४१९ मतदान केंद्रांवर मतदानाची तयारी

निवडणुकीसाठी एकूण १० लाख ६८ हजार ७२ मतदारांची नोंदणी झाली आहे. त्यामध्ये पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक ३ लाख ८८ हजार १९ मतदार आहेत. तर अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात सर्वांत कमी ३५ हजार ८१० मतदार आहेत.

मतदान केंद्रांची विभागनिहाय व्यवस्था पुढीलप्रमाणे आहे :

औरंगाबाद विभाग पदवीधर : ८४२ केंद्रे
पुणे विभाग पदवीधर : ७४१ केंद्रे
नागपूर विभाग पदवीधर : ४४५ केंद्रे
अमरावती विभाग शिक्षक : ८१ केंद्रे
पुणे विभाग शिक्षक : ३१० केंद्रे

मतदानाच्या दिवशी कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी आवश्यक प्रशासकीय नियोजन करण्यात आले आहे.

विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबरला संपणार

या पाचही विधान परिषद सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येत आहे. यामध्ये औरंगाबाद पदवीधर मतदारसंघाचे सतीश भानुदासराव चव्हाण, पुणे पदवीधर मतदारसंघाचे अरुण गणपती लाड, नागपूर पदवीधर मतदारसंघाचे अभिजीत गोविंदराव वंजारी, अमरावती शिक्षक मतदारसंघाचे किरण रामराव सरनाईक आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे जयंत दिनकर आसगावकर यांचा समावेश आहे. भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ही निवडणूक होत आहे. २३ ऑक्टोबरला मतदान, २७ ऑक्टोबरला मतमोजणी आणि ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

कुस्ती स्पर्धेत ओम चौधरीची कांस्यपदकाला गवसणी!

गो.पु. पाटील विद्यालयाच्या क्रीडा यशात मानाचा तुरा

जन सम्राट टाईम्स

भडगाव।। प्रतिनिधी : कुस्तीच्या आखाड्यात जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर गोपीचंद पुना पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, कोळगाव येथील उदयोन्मुख कुस्तीपटू ओम श्रीराम चौधरी याने ७० व्या राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावत कांस्यपदकाची कमाई केली. भोसे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथे झालेल्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत ओमने मिळविलेल्या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विभागीय यशानंतर राज्यस्तरावरही चमकदार कामगिरी ओम श्रीराम चौधरी याने यापूर्वी नाशिक विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली होती. विभागीय स्तरावरील यशानंतर राज्यस्तरावरही त्याने आपल्या कुस्ती कौशल्याची आणि संघर्षशील वृत्तीची छाप उमटवली. राज्यातील उत्कृष्ट कुस्तीपटूंशी स्पर्धा करत तृतीय क्रमांक मिळवणे ही त्याच्या नियमित सरावाची, मेहनतीची आणि आत्मविश्वासाची पावती मानली जात आहे. ओमच्या या यशामुळे कोळगाव परिसरातील क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यालयाच्या क्रीडा परंपरेत आणखी एका यशाची भर कर्मवीर तात्यासाहेब हरि रावजी पाटील किसान शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा क्षेत्रातील गुणविकासालाही प्राधान्य दिले जाते. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी कुस्ती, ज्युडो, वेटलिफ्टिंग, खो-खो आणि मैदानी स्पर्धांमध्ये मिळविलेल्या यशामुळे संस्थेची क्रीडा क्षेत्रातील ओळख अधिक भक्कम होत आहे. ओमच्या यशामागे मार्गदर्शक शिक्षक, क्रीडा प्रशिक्षक आणि विद्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.



पर्यवेक्षक तथा आदर्श क्रीडा शिक्षक बी. डी. साळुंखे, ज्येष्ठ शिक्षक प्रा. रघुनाथ अरविंद पाटील आणि राष्ट्रीय खो-खो पंच प्रा. प्रेमचंद चौधरी यांच्यासह विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन मिळत आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव ओम श्रीराम चौधरी याच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब प्रतापराव पाटील, उपाध्यक्षा डॉ. पुनमताई पाटील, मंत्रालयीन उपसचिव दादासाहेब प्रशांत पाटील, विद्यालयाचे प्राचार्य आर. आर. वळखंडे, प्रभारी कार्यवाहक मनोजकुमार पवार, पर्यवेक्षक बी. डी. साळुंखे, शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले. राज्यस्तरीय स्पर्धेत मिळविलेले हे यश ओमच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. भविष्यातही त्याने उच्चस्तरीय स्पर्धांमध्ये यश संपादन करून विद्यालय, कोळगाव आणि भडगाव तालुक्याचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि शिक्षकांनी व्यक्त केल्या. ओमच्या कांस्यपदकामुळे कोळगाव परिसरात आनंदाचे वातावरण असून, त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कुस्तीच्या आखाड्यात जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर गोपीचंद पुना पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, कोळगाव येथील उदयोन्मुख कुस्तीपटू ओम श्रीराम चौधरी याने ७० व्या राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावत कांस्यपदकाची कमाई केली. भोसे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथे झालेल्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत ओमने मिळविलेल्या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विभागीय यशानंतर राज्यस्तरावरही चमकदार कामगिरी ओम श्रीराम चौधरी याने यापूर्वी नाशिक विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली होती. विभागीय स्तरावरील यशानंतर राज्यस्तरावरही त्याने आपल्या कुस्ती कौशल्याची आणि संघर्षशील वृत्तीची छाप उमटवली. राज्यातील उत्कृष्ट कुस्तीपटूंशी स्पर्धा करत तृतीय क्रमांक मिळवणे ही त्याच्या नियमित सरावाची, मेहनतीची आणि आत्मविश्वासाची पावती मानली जात आहे. ओमच्या या यशामुळे कोळगाव परिसरातील क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यालयाच्या क्रीडा परंपरेत आणखी एका यशाची भर कर्मवीर तात्यासाहेब हरि रावजी पाटील किसान शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा क्षेत्रातील गुणविकासालाही प्राधान्य दिले जाते. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी कुस्ती, ज्युडो, वेटलिफ्टिंग, खो-खो आणि मैदानी स्पर्धांमध्ये मिळविलेल्या यशामुळे संस्थेची क्रीडा क्षेत्रातील ओळख अधिक भक्कम होत आहे.

संपादकीय

महागाईचा भडका; सामान्यांच्या जगण्याचीच कोंडी!

महागाईचा आकडा कागदावर कितीही लहान दिसला, तरी त्याची झळ सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरापर्यंत पोहोचते. महिन्याच्या सुरुवातीला भरलेली किराणा पिशवी शेवटपर्यंत पुरत नाही, भाजीपाला खरेदी करताना हात आखडता घ्यावा लागतो, मुलांच्या डब्यातील पौष्टिक पदार्थ कमी होतात आणि औषधोपचारासाठी बाजूला ठेवलेले पैसे घरखर्चात खर्च होतात, तेव्हा महागाईचे खरे स्वरूप समोर येते. आज देशातील सामान्य नागरिकांची अवस्था यापेक्षा वेगळी नाही. सप्टेंबर २०२६ मध्ये भारताचा किरकोळ महागाई दर ५.५४ टक्क्यांवर पोहोचला, तर अन्नमहागाईचा दर ७.७४ टक्के नोंदवला गेला.

ऑगस्टमधील ४.८३ टक्क्यांच्या तुलनेत ही वाढ चिंताजनक आहे. महागाईचा दर सलग चौथ्या महिन्यात रिझर्व्ह बँकेच्या चार टक्क्यांच्या मध्यमकालीन उद्दिष्टापेक्षा जास्त राहिला आहे. ही आकडेवारी केवळ अर्थव्यवस्थेतील बदल दर्शवत नाही; ती कोट्यवधी कुटुंबांच्या बिघडलेल्या आर्थिक गणिताची कहाणी सांगते.

आकडेवारीच्या पलीकडचे महागाईचे वास्तव

महागाईची चर्चा करताना सकल देशांतर्गत उत्पादन, व्याजदर, चलनवाढ आणि आर्थिक धोरणे यांचा ऊहापोह होतो. पण सामान्य माणसासाठी महागाईचे गणित साधे आहे—उत्पन्न तेवढेच, खर्च मात्र वाढता! पगारवाढीचा वेग मर्यादित असताना किराणा, भाजीपाला, दूध, इंधन, शिक्षण आणि आरोग्यसेवेचे खर्च वाढत असतील, तर घर चालवायचे कसे? उत्पन्नाचा मोठा भाग मूलभूत गरजांवर खर्च होऊ लागला की बचत कमी होते. बचत संपली की कर्जाचा आधार घ्यावा लागतो. आणि कर्ज वाढले की भविष्यातील उत्पन्नही आजच्या खर्चासाठी गहाण पडते. सप्टेंबरमधील आकडेवारीनुसार ग्रामीण भागातील किरकोळ महागाई ६.०८ टक्के, तर शहरी भागातील महागाई ४.८८ टक्के होती. म्हणजेच महागाईचा भार ग्रामीण जनतेवर अधिक पडत आहे. अन्नमहागाईचा दरही ग्रामीण भागात ८.०६ टक्के नोंदवला गेला, तर शहरी भागात तो ७.१८ टक्के होता. ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नाचा मोठा भाग अन्नधान्य आणि दैनंदिन गरजांवर खर्च होत असल्याने दरवाढीचा परिणाम त्यांच्या आर्थिक स्थितीवर अधिक तीव्रतेने होतो. त्यामुळे महागाईचे एकच राष्ट्रीय सरासरीचे चित्र पाहून समाधान मानता येणार नाही. तिचा भार कोणावर आणि किती पडतो, हे पाहणेही तितकेच आवश्यक आहे. अन्नमहागाई ही सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाला थेट भिडणारी समस्या आहे. कांदा, लसूण, लिंबू, पालेभाज्या, डाळी आणि कडधान्यांच्या दरांत वाढ झाली की घरातील स्वयंपाकाचे नियोजन बदलते. पूर्वी सहज विकत घेतल्या जाणाऱ्या वस्तूंची खरेदी आता मोजूनमापून करावी लागते. काही पदार्थांचा वापर कमी होतो, काहींची खरेदी पुढे ढकलली जाते, तर काही वस्तूंचा पर्याय शोधावा लागतो. गरीब आणि निम्नमध्यमवर्गीय कुटुंबांसाठी ही केवळ काटकसर नसते; ती पोषणाच्या गरजांशी केलेली तडजोड असते.

पोट भरणे आणि सकस आहार घेणे यात मोठा फरक आहे. घरखर्च भागवण्यासाठी डाळी, फळे, दूध किंवा भाज्यांचे प्रमाण कमी करावे लागत असेल, तर त्याचा परिणाम विशेषतः लहान मुले, गर्भवती महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर होऊ शकतो. त्यामुळे अन्नमहागाईला केवळ बाजारातील मागणी-पुरवठ्याचा विषय मानणे चुकीचे ठरेल. तो सार्वजनिक आरोग्याशी आणि सामाजिक सुरक्षिततेशी संबंधित प्रश्न आहे. बाजारात वस्तू उपलब्ध असल्या, पण त्या विकत घेण्याची क्षमता नसली, तर उपलब्धतेचा फायदा सर्वांपर्यंत पोहोचत नाही. महागाईच्या या संकटाला दुष्काळाची जोड मिळाली की ग्रामीण जीवन अधिकच कठीण होते. पाऊसमानातील अनिश्चितता, एल निनोचा संभाव्य प्रभाव आणि उत्पादनातील घट यामुळे अन्नधान्याच्या पुरवठ्यावर दबाव निर्माण होऊ शकतो. राज्यातील अनेक भागांत पाणीटंचाई, पिकांचे नुकसान आणि चाऱ्याची कमतरता जाणवत असेल, तर शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडते. शेतात पीक नाही, उत्पन्नाची खात्री नाही आणि बाजारात वस्तू महाग—अशा तिहेरी संकटात शेतकरी अडकतो.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

जिजाऊ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आयुध पूजन सोहळा उत्साहात



जन सम्राट टाईम्स

परभणी । प्रतिनिधी : पाथरी रोड येथील जिजाऊ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पारंपरिक उत्साहात आयुध पूजन सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. रामराव दादा लोहट होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे प्राचार्य श्री. ज्ञानेश्वर तरवटे उपस्थित होते. यावेळी संस्थेतील प्रशिक्षणार्थी, शिक्षक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. कौशल्याधारित शिक्षणातून भविष्य घडवा! अध्यक्षीय मनोगतात रामराव दादा लोहट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता प्रत्यक्ष कामातील कौशल्ये आत्मसात करावीत. मेहनत, प्रामाणिकपणा आणि शिस्त यांच्या जोरावर स्वतःचे भविष्य घडवावे, असे आवाहन त्यांनी केले. औद्योगिक क्षेत्रात सुरक्षितता आणि अचूकतेला महत्त्व प्राचार्य ज्ञानेश्वर तरवटे यांनी आयुध पूजनाचे महत्त्व स्पष्ट करताना औद्योगिक क्षेत्रात तांत्रिक ज्ञानासोबतच सुरक्षितता, अचूकता आणि कामाप्रती निष्ठा या गुणांना विशेष महत्त्व असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणादरम्यान या गुणांचा अंगीकार करून भविष्यात कुशल आणि जबाबदार तंत्रज्ञ बनण्यासाठी प्रयत्न करावेत, असे त्यांनी नमूद केले. गटनिदेशक सिद्धेश्वर जाधव यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन याप्रसंगी संस्थेचे गटनिदेशक सिद्धेश्वर जाधव यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आपल्या अनुभवपूर्ण विचारांतून त्यांनी मेहनत, आत्मविश्वास, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन यांचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असा संदेश त्यांनी दिला. शिक्षक व कर्मचाऱ्यांचे सहकार्य कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चव्हाण सर यांनी केले, तर कुलथे सर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी चव्हाण सर, स्वामी सर, रेंगे सर, रसाळ सर, प्रवीण सर आणि सपना मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले.पाथरी रोड येथील जिजाऊ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पारंपरिक उत्साहात आयुध पूजन सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. रामराव दादा लोहट होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे प्राचार्य श्री. ज्ञानेश्वर तरवटे उपस्थित होते. यावेळी संस्थेतील प्रशिक्षणार्थी, शिक्षक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. कौशल्याधारित शिक्षणातून भविष्य घडवा! अध्यक्षीय मनोगतात रामराव दादा लोहट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

शेतकरी, शेतमजूर आणि विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी पाचोऱ्यात महाविकास आघाडीचे आंदोलन!

हेक्टरी एक लाखांची मदत, शेतमजुरांना २५ हजारांचे अनुदान देण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

पाचोरा । प्रतिनिधी : शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी पाचोरा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत, शेतमजुरांना २५ हजार रुपयांचे अनुदान, थकीत दुष्काळी निधीचे वितरण, पीकविम्याची रक्कम मंजूर करणे आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करणे यांसह विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या. आंदोलनानंतर तहसीलदार विजय बनसोडे यांनी निवेदन स्वीकारून मागील काळातील थकीत दुष्काळी निधी दिवाळीपूर्वी जमा करण्याचे आश्वासन दिले. शेतीतील वाढता उत्पादन खर्च, नैसर्गिक संकटांमुळे पिकांचे होणारे नुकसान, कर्जाचा वाढता बोजा आणि शासकीय मदतीसाठी होणारा विलंब यामुळे ग्रामीण भागातील नागरिक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या



पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आंदोलन करत शासनाने प्रलंबित प्रश्नांवर तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी केली. शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत द्या! नैसर्गिक संकटांमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी हेक्टरी एक लाख रुपये मदत देण्यात यावी, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली. त्याचबरोबर शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी, पात्र शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम तातडीने वितरित करावी आणि मागील काळातील थकीत दुष्काळी अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात विनाविलंब जमा करावे, अशी मागणी करण्यात आली. शेतमजुरांसाठी २५ हजारांच्या अनुदानाची मागणी शेतीवर अवलंबून असलेल्या शेतमजुरांनाही रोजगारातील अनिश्चितता आणि वाढत्या महागाईचा फटका बसत आहे. त्यामुळे शेतमजुरांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचे अनुदान देण्यात यावे, अशी मागणी आंदोलनातून करण्यात आली. शेतकरी आणि शेतमजूर या ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महत्त्वाच्या घटकांना आर्थिक आधार देण्यासाठी शासनाने ठोस धोरण राबवावे, अशी भूमिका पदाधिकाऱ्यांनी मांडली. सातगाव डोंगरी, शिंदाड परिसरातील नुकसानभरपाईचा प्रश्न ऐरणीवर सातगाव डोंगरीसह शिंदाड परिसरातील शेतकऱ्यांच्या मागील वर्षातील नुकसानीचा मुद्दाही आंदोलनात उपस्थित करण्यात आला. संबंधित शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे होऊनही भरपाई मिळालेली नसल्याची तक्रार आंदोलकांनी केली. पंचनाम्यांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही नुकसानभरपाईसाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रलंबित नुकसानभरपाई तातडीने मंजूर करून संबंधित शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करण्याची मागणी शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांसोबतच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मुद्दाही आंदोलनात मांडण्यात आला. सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करावी, अशी मागणी करण्यात आली. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये आणि गरीब कुटुंबांवरील शैक्षणिक खर्चाचा भार कमी व्हावा, यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. दिवाळीपूर्वी निधी देण्याचे तहसीलदारांचे आश्वासन आंदोलनस्थळी तहसीलदार विजय बनसोडे यांनी भेट देऊन आंदोलकांचे निवेदन स्वीकारले. मागील काळातील थकीत दुष्काळी निधी दिवाळीपूर्वी जमा करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यामुळे प्रलंबित निधीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांचे लक्ष आता प्रशासनाच्या पुढील कार्यवाहीकडे लागले आहे. यावेळी पोलीस निरीक्षक राहुल पवार आणि पोलीस कॉन्स्टेबल दीपक पाटील उपस्थित होते. आंदोलनात शेकडो कार्यकर्त्यांनी सहभाग घेत शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली.

म्हसाळेतील ग्रीनको सोलर प्रकल्पात बिबट्याचा शिरकाव!

जन सम्राट टाईम्स

साक्री | प्रतिनिधी : साक्री तालुक्यातील म्हसाळे गावाजवळ असलेल्या ग्रीनको सोलर प्रकल्पाच्या कंपनीच्या आवारात बिबट्या आढळल्याने खळबळ उडाली आहे. रात्रीच्या वेळी सुरक्षारक्षकाला बिबट्या दिसल्यानंतर कंपनी परिसरात सतर्कतेचे वातावरण निर्माण झाले. सुरक्षारक्षकांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करून बिबट्याला कंपनीच्या आवाराबाहेर काढल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेचा व्हिडिओ सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याची माहिती आहे. सुमारे ६५० एकर परिसरात सोलर प्रकल्प म्हसाळे गावाजवळ सुमारे ६५० एकर क्षेत्रात ग्रीनको सोलर प्रकल्प कार्यरत आहे. या प्रकल्पाच्या जवळच जंगल असल्याने वन्यप्राण्यांचा वावर असण्याची शक्यता आहे. मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्या कंपनीच्या आवारात आढळल्याचे सांगण्यात आले. रात्रीच्या ड्युटीवर असलेल्या सुरक्षारक्षकाच्या नजरेस बिबट्या पडताच त्याने इतर सहकाऱ्यांना सतर्क केले. त्यानंतर सुरक्षारक्षकांनी ड्रोन कॅमेऱ्याच्या मदतीने बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवत त्याला कंपनीच्या परिसरातून बाहेर काढल्याचा दावा केला जात आहे. वनविभागाने तातडीने लक्ष देण्याची मागणी या घटनेमुळे कंपनीतील कर्मचारी आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याचा वावर पुन्हा होऊ नये, यासाठी वनविभागाने घटनास्थळी पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. बिबट्या कंपनीच्या आवाराबाहेर गेल्याचे सांगण्यात येत असले, तरी तो नेमका कोणत्या दिशेने गेला, याची अधिकृत माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकांनी आणि कर्मचाऱ्यांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. वनविभागाने बिबट्याच्या हालचालींचा मागोवा घेऊन परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

देशमुख महाविद्यालयात 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा!

अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन; विद्यार्थ्यांना वाचनसंस्कृती जोपासण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

भडगाव । प्रतिनिधी : तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित भडगाव येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ आणि भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. कलाम यांच्या स्मृतींना अभिवादन करून वाचनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. वाचनातून ज्ञानसमृद्ध व्यक्तिमत्त्व घडवा! कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी डॉ. कलाम यांच्या कार्याचा गौरव करत विद्यार्थ्यांच्या जीवनातील वाचनाचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानार्जनाची प्रेरणा जागृत व्हावी आणि समाजात वाचनसंस्कृतीचा विकास व्हावा, हा वाचन प्रेरणा दिनाच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी वैज्ञानिक संशोधन,



राष्ट्रपतीपदावरील कार्य आणि प्रेरणादायी विचारांच्या माध्यमातून देशातील तरुणांना ज्ञान, विज्ञान आणि स्वप्नपूर्तीची दिशा दिली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन ज्ञानाची कास धरावी आणि आपल्या ध्येयपूर्तीसाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहन यावेळी करण्यात आले. पुस्तकांशी मैत्री करा : डॉ. अतुल देशमुख मराठी विभागप्रमुख डॉ. अतुल देशमुख यांनी प्रास्ताविकातून वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जाणारा हा दिवस विद्यार्थ्यांना पुस्तकांशी मैत्री करण्याची आणि ज्ञानसमृद्ध जीवन घडविण्याची प्रेरणा देतो. वाचनामुळे विचारांना व्यापकता मिळते, ज्ञानात भर पडते आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले. प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती कार्यक्रमाच्या मंचावर उपप्राचार्य डॉ. एस. डी. भैसे, इतिहास विभागप्रमुख डॉ. सी. एस. पाटील आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. एस. भालेराव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ए. एम. पाटील यांनी केले. यावेळी डॉ. एस. एन. हडोळतीकर, प्रा. एस. सी. पाटील, डॉ. गजानन चौधरी, डॉ. इंदिरा लोखंडे, डॉ. जनार्दन देवरे, प्रा. प्रवीण देसले, प्रा. स्नेहा गायकवाड, प्रा. मयूर दायमा, प्रा. श्रद्धा ठाकूर यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित भडगाव येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती, आणि भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

निसर्गाचा बळी देऊन विकास नको!

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी : रुंद रस्ते आणि चकचकीत पायाभूत सुविधा उभारल्या म्हणजे विकास झाला, असे मानता येणार नाही. सामान्य माणसाला रोजगार, दर्जेदार आरोग्यसेवा आणि मूलभूत सुविधा मिळणे तितकेच आवश्यक आहे. विकास करताना निसर्गाची हानी आणि स्थानिकांच्या हिताकडे दुर्लक्ष होणार असेल, तर त्याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे, असे मत प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. नीरज हातेकर यांनी बावधन येथे व्यक्त केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान व सेवा संकल्प अभियानांतर्गत बावधन ग्रामपंचायत आणि मंगलमूर्ती सोशल क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डीजे-डॉल्बीचा वापर टाळून पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करणाऱ्या गावातील २५ गणेशोत्सव मंडळांचा, तसेच वृक्षसंवर्धनासाठी योगदान देणाऱ्या तीन वृक्षमित्रांचा यावेळी सन्मान करण्यात आला. डॉ. हातेकर म्हणाले, विकासाची आवश्यकता नाकारता येणार नाही; मात्र त्यासाठी पर्यावरणाला मोजावी लागणारी किंमतही लक्षात घेतली पाहिजे. सुरूर–वाई रस्त्याच्या वाढते तापमान आणि भविष्यातील संभाव्य पाणीटंचाई यांचा परस्परसंबंध समजून घेण्याची गरज आहे. मोठे प्रकल्प उभारताना त्यांचा स्थानिक नागरिकांच्या जगण्यावर काय परिणाम होतो.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

राजस्थानच्या मिणा समाजाचे विजयसिंग पागडी यांची भडगावला सदिच्छा भेट!

अशोकबापू परदेशी यांच्या निवासस्थानी उत्साहात स्वागत

जन सम्राट टाईम्स

भडगाव । प्रतिनिधी: राजस्थानातील दौसा जिल्ह्यातील सिकराय तालुक्यातील मोरेड येथील रहिवासी आणि सध्या पुण्यात आयटी कंपनीत कार्यरत असलेले मिणा समाजाचे विजयसिंग पागडी (घुणावत) यांनी भडगाव येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी परदेशी, राजपूत, मिणा समाजाचे भडगाव तालुकाध्यक्ष तथा पत्रकार अशोकबापू परदेशी यांच्या निवासस्थानी त्यांचे कुटुंबीय आणि समाजबांधवांच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. या भेटीदरम्यान समाज संघटनेची बांधणी, समाजाच्या प्रगतीसाठी सुरू असलेले उपक्रम आणि सामाजिक एकजूट अधिक बळकट करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. महाराष्ट्रातील मिणा समाजाच्या कार्याचे राजस्थानकडून कौतुक विजयसिंग पागडी यांनी महाराष्ट्रातील मिणा, परदेशी आणि राजपूत समाजबांधवांच्या कार्याचे कौतुक केले. समाज संघटन मजबूत करण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्ते घेत असलेले परिश्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन करत त्यांनी महाराष्ट्रातील समाजबांधवांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. समाजातील विविध संघटनांच्या माध्यमातून सुरू असलेले सामाजिक कार्य, समाजबांधवांचे योगदान आणि संघटन विस्तारासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती यावेळी देण्यात आली. समाजाच्या प्रगतीसाठी



